स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई.
(अधिष्ठाता यांचे कार्यालय)
SWAMI RAMANAND TEERTH RURAL GOVT. MEDICAL COLLEGE, AMBAJOGAI DIST BEED
PH NO (02446)245792/248963/249362/248436/-DFAX02446/247132 Website www.srtrmca.org emailsrt.acad@rediffmail.com

जा.क्र. वैमअं/किनांवि/दरपत्रके मागवी/ 599 /२०२२ दिनांक- 25 /०१/२०२२

**कार्यालयीन आदेश**

विषय :-वाळवी प्रतिबंधात्मक उपाययोजनाकरीता दरपत्रक सादर करणे बाबत...
संदर्भ :-दि.२५.०१.२०२२ रोजीची मंजुर टिपणी.

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. १ व २ अन्वये आपणास कळविण्यात येते की, या महाविद्यालयातील विविध विषयांचे विभाग, ग्रंथालय विभाग,प्रशासकीय कार्यालय व वैद्यकीय विद्यार्थी वसतीगृहाकरीता वाळवी प्रतिबंधात्मक उपाययोजनासाठी दरपत्रक खालील प्रमाणे यादीनुसार सादर करण्यात यावे.

तसेच सदर सुचनेनुसार मोहरबंद दरपत्रके मा.अधिष्ठाता,स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई यांच्या नावे सादर करण्यात यावी.तसेच सदरील साहित्यांचे दरपत्रक सादर करण्यासाठी अंतिम दिनांक ०१ /०२/ २०२२ रोजी दुपारी ०५:०० वा. पर्यंत असून प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक ०२/०२/२०२२ रोजी प्रशासकीय कार्यालयात खरेदी समिती समक्ष उघडण्यात येतील.तसेच दरपत्रकधारकास दरपत्रके उघडण्याकरीता उपस्थित राहावयाचे असल्यास या कार्यालयाची काही हरकत नाही.

| अ.क्र. | साहित्यांचे नाव | नग संख्या | प्रत्येकी दर |
|---|---|---|---|
| ०१ | हर्बो स्प्रे (डिलक्स) | ४०० एम एल/०१ बॉटल | ... |
| ०२ | सॅनिटॉलीन सुपर लिक्वीड | ०१ लिटर | ... |

अटी व शर्ती :-

०१.दरपत्रक धारकाने मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ नुसार दुकानाचे शासनमान्य नोंदणी प्रमाणपत्र किंवा दरपत्रक धारकाकडे सुक्ष्म,लघु व मध्यम उद्यम मंत्रालय भारत सरकार यांच्याकडे नोंदणी केलेले उद्योग आधार प्रमाणपत्र छायांकीत प्रत दरपत्रका सोबत जोडणे बंधनकारक आहे.

०२.दरपत्रक धारकाच्या दुकानाचे नाव, संपुर्ण पत्ता, नोंदणी क्रमांक,जिएसटी नंबर व पॅन नंबर असलेल्या दुकानाच्या लेटर पॅडवर सहि व शिक्का असलेली दरपत्रके सदर साहित्याच्या अ.क्र. यादीनुसार सादर करण्यात यावी. तसेच ज्या साहित्यांचे दर उपलब्ध होऊ शकत नाहित त्या साहित्यांच्या दराच्या ठिकाणी एन.ए. (NA) असे नमुद करावे.

०३.दरपत्रका सोबत शासनमान्य जिएसटी प्रमाणपत्र, फर्मच्या नावाचे किंवा प्रोप्रायटरच्या नावाचे पॅन कार्डची छायांकीत प्रत,सन २०२०-२१ किंवा सन २०२१-२२ या वर्षाचे आयटीआर प्रमाणपत्र जोडण्यात यावे तसेच एकल दरपत्रक धारक असल्याचे स्वत: स्वाक्षरीचे प्रपत्र-अ जोडणे बंधनकारक आहे. (सदर प्रपत्र-अ नमुना पान क्र. ०२ वर देण्यात आलेला आहे.)

०४.दरपत्रकातील साहित्यांच्या दरातजीएसटी कर समाविष्ठ करण्यात आला आहे किंवा अतिरिक्त आकारला जाणार आहे याबाबत नमुद करणे बंधनकारक आहे. तसेच दरपत्रकातील दर बाजार भावापेक्षा जास्त दराचे सादर करण्यात येऊ नये.तसेच सर्व साहित्य स्वत: स्वखर्चाने दहा दिवसांच्या आत पुरवठा करणे बंधनकारक राहिल. तसेच वाहतुक खर्च किंवा इतर कोणताही जादा खर्च देण्यात येणार नाही.

०५.मागविण्यात आलेल्या साहित्यांचे दरपत्रक प्रमाणित झाल्याच्या दिनांका पासुन सहा (०६) महिन्यांपर्यंत वैध राहतील.

०६.प्रशासकीय कारणास्तव देयके अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब शुल्क किंवा व्याज देण्यात येणार नाही.

०७.पुरवठा करण्यात येणारे साहित्य नामांकीत कंपनीचेगॅरंटी व वारंटीसह चांगल्या प्रतीचे असावे. हलके किंवा निकृष्ठ दर्जाचे असल्यास पुरवठा आदेश रद्द करण्यात येतील तसेचरद्द करण्यात आलेल्या आदेशाचे कोणतेही देयक अदा केले जाणार नाही व याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहिल.

०८.तसेच अपुर्ण माहितीसह व प्रमाणपत्रा शिवाय सादर केलेली संबंधीतांची दरपत्रके विना स्पष्टीकरन नाकारण्यात येतील व याबाबत कसल्याही प्रकारे लेखी स्वरुपात कळविण्यात येणार नाही. तसेच कोणतेही उर्वरीत प्रमाणपत्र पुनश्च: मागविण्यात येणार नाहीत. तसेच प्रशासकीय कारणास्तव किंवा निधी अभावी काही अडचण निर्माण झाल्यास साहित्य खरेदीबाबत सदरच्या दरपत्रकाची संपुर्ण प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांना राहील.

अधिष्ठाता
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय
वैद्यकिय महाविद्यालय,अंबाजोगाई.

प्रत:- १.संस्थेची वेबसाईट ,स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. अंबाजोगाई.
२.नोटीस बोर्ड महाविद्यालय विभाग,स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. अंबाजोगाई.

## प्रपत्र- अ
## निविदाकारांनी द्यावयाचा हमीपत्राचा नमुना

प्रमाणित करण्यात येते की, मी / आम्ही आमची संस्था .......................................................या पत्रान्वये हामी देतो की, आमचा खरेदी प्राधीकारी बरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंधाचा संघर्ष नाही. तसेच मी/आम्ही/ आमची संस्था सदर कामासाठी फक्त एकच निविदा सादर केलेली आहे. तसेच दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेण्याच्या अन्य संस्थामध्ये आम्हाला कोणत्याही प्रकारचे थेट स्वारस्य नाही.तरी याबाबत पुढील काळात आपल्या कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास माझ्यावर होणाऱ्या दंडात्मक कार्यवाहीस मी स्वतः जबाबदार राहील. करीता सदर प्रमाणपत्र सादर करण्यात येत आहे.

दरपत्रक धारकाची स्वाक्षरी व शिक्का

दिनांक :-

नाव :-
ठिकाण :-

पत्ता :-

मो.नं. :-